**ठळक बातम्या**

- महिला आरक्षणासाठी प्रत्येक राज्यातल्या खासदारांची संख्या ५० टक्क्यांनी वाढणार असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- सरकारनं सादर केलेल्या महिला आरक्षण विधेयकाचा महिलांच्या सक्षमीकरणाशी संबंध नसल्याचा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांचा दावा

- राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश नारायण सिंग यांची बिनविरोध निवड

- भोंदू बाबा अशोक खरातशी संबंधित संस्थांच्या मालमत्तांवर सक्तवसुली संचालनालयाचे छापे

**आणि**

- अमरावतीमधे मुलींच्या लैंगिक छळ प्रकरणात व्हिडीओ अपलोड करणाऱ्यांची चौकशी करण्याचे राष्ट्रीय महिला आयोगाचे पोलिसांना निर्देश

**<><><><><>**

महिला आरक्षण लागू करण्यासाठी सर्व राज्यातल्या खासदारांची संख्या ५० टक्क्यांनी वाढणार आहे. त्यामुळं कुठल्याही राज्याच्या प्रतिनिधीत्वावर अन्याय होणार नाही, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज लोकसभेत केलं. महिला आरक्षण विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. २०२९ पासून महिला आरक्षण लागू करायचं असेल तर आता हे विधेयक मंजूर होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. मंत्रीमंडळानं मान्यता दिल्यानुसार चालू जनगणनेत जातनिहाय गणना होणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. कॉंग्रेसमुळं देशात ५० वर्ष मतदार संघ पुनर्रचना होऊ शकली नसल्याचा आरोप त्यांनी केला.

**- होल्ड अमित शहा बाइट**

देशातल्या १२० लोकसभा मतदारसंघात २० लाखांपेक्षा जास्त मतदार आहेत. त्यांच्याकडे लक्ष देणं खासदारांना शक्य नाही. त्यामुळं मतदारसंघ फेररचना आवश्यक असल्याची गरज त्यांनी व्यक्त केली. खासदारांच्या संख्येत वाढ करताना संसदेच्या कामकाजाची वेळ वाढवली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

लोकसभेत आजही महिला आरक्षणाच्या संदर्भातलं १३१ वं संविधान दुरुस्ती विधेयक, पुनर्रचना विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश दुरुस्ती विधेयकावर चर्चा सुरू आहे. याविषयी अधिक तपशील जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(देशातल्या कोट्यवधी महिलांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी हे विधेयक सादर केलं असल्याचं केंद्रीय महिला आणि बाल कल्याण मंत्री अन्नपूर्णा देवी म्हणाल्या. निर्णय प्रक्रियेत महिलांना योग्य स्थान देण्यासाठी हे विधेयक आणलं आहे. सरकारनं सादर केलेल्या नारी शक्ती वंदन अधिनियमाचा महिला सक्षमीकरणाशी काहीही संबंध नसल्याचा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. देशातल्या निवडणुकांचं गणित याद्वारे बदलण्याचा घाट सरकारनं घातला आहे. यामुळं दलित आणि ओबीसींचे हक्क डावलले जातील, असं राहुल गांधी म्हणाले. यावेळी राहुल गांधी यांच्या वक्तव्यातल्या काही शब्दांवर सभापती ओम बिर्ला यांनी आक्षेप घेतला आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी राहुल गांधींनी प्रधानमंत्र्यांची माफी मागावी अशी मागणी केली. सर्व महिलांचा त्याग, कष्ट आणि धैर्याला सलाम म्हणून हे विधेयक आणलं जात असल्याचं भाजपाच्या हेमा मालिनी म्हणाल्या. देशातली संघराज्य व्यवस्था विस्कळीत करण्यासाठी हे विधेयक आणल्याचा आरोप द्रमुकच्या के कनिमोळी म्हणाल्या. काँग्रेसच्या शशी थरूर यांनी यावर विस्तारानं चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त केली. तृणमूल काँग्रेसच्या कल्याण बॅनर्जी यांनी सर्व महत्त्वाच्या पदांवर महिलांसाठी ५० टक्के आरक्षण ठेवण्याची मागणी केली. )*

**<><><><><>**

१०६ वी घटना दुरुस्ती अधिनियम २०२३ म्हणजेच 'नारी शक्ती वंदन अधिनियम' आजपासून लागू झाल्याची अधिसूचना जारी झाली आहे. २०२३ मध्ये संसदेने हा कायदा संमत केला. या कायद्यामुळे लोकसभा आणि दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्राच्या विधानसभांसह सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश जागा फिरत्या पद्धतीने राखीव ठेवण्याची तरतूद या कायद्यात आहे.

**<><><><><>**

राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश नारायण सिंग यांची बिनविरोध निवड झाली. केंद्रीय मंत्री आणि सभागृह नेते जगत प्रकाश नड्डा यांनी हरिवंश यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. भाजपा खासदार एस फँगनॉन कोन्याक यांनी अनुमोदन

दिलं. ९ एप्रिल रोजी हरिवंश यांचा कार्यकाळ संपल्यानंतर हे पद रिक्त झालं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हरिवंश यांचं अभिनंदन केलं.

**- - - होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री - - -**

सलग तिसऱ्यांना उपाध्यक्ष म्हणून झालेली निवड, सभागृहाचा हरिवंश यांच्यावरचा ठाम विश्वास असल्याचं दर्शवते. माजी प्रधानमंत्री चंद्रशेखर यांच्या जयंतिदिनीच त्यांचे सहकारी हरिवंश यांची तिसऱ्यांदा निवड झाल्याचं प्रधानमंत्री मोदी म्हणाले. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि इतर पक्षांच्या गटनेत्यांनीही हरिवंश यांचं अभिनंदन केलं.

**<><><><><>**

म्हाडाच्या मुंबई मंडळातर्फे गोरेगाव पश्चिम इथल्या मोतीलाल नगर पुनर्विकास योजनेच्या आराखड्याचं अनावरण आज झालं. १४३ एकरात विस्तारलेल्या या प्रकल्पाचा पुनर्विकास अदानी समुहाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**<><><><><>**

नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरातशी संबंधित संस्थांविरुद्ध आर्थिक गुन्हे तपासाचा भाग म्हणून सक्तवसुली संचालनालयाने आज नाशिक जिल्ह्यात विविध ठिकाणी छापे टाकले. शरणपूर इथल्या खरातच्या एका मालमत्तेमधून काही कागदपत्रं आणि संगणकीय उपकरणं जप्त करण्यात आली आहेत. यापूर्वी १३ एप्रिल रोजी खरात, त्याचा सनदी लेखापाल प्रकाश पोफळे, खरातचे नातेवाईक आणि काही सहकारी पतसंस्थांच्या शाखांशी संबंधित व्यावसायिक आणि निवासी जागांवर छापे टाकण्यात आले होते. त्यावेळी ४२ लाख रुपये रोख आणि २ कोटी ४० लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली होती.

**<><><><><>**

अमरावतीमधे मुलींच्या लैंगिक छळ प्रकरणातल्या पीडितांचे व्हिडीओ समाज माध्यमांवरुन काढून टाकावेत आणि व्हिडीओ अपलोड करणाऱ्यांची चौकशी

करावी, असे आदेश राष्ट्रीय महिला आयोगानं पोलिसांना दिले आहेत. याप्रकरणी वेळेत चौकशी पूर्ण करून कठोर कारवाई करण्याचे निर्देश राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी पोलिस महासंचालकांना दिले आहेत. याप्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवालही आयोगानं ५ दिवसात मागवला आहे.

**<><><><>**

नाशिक इथं होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर इथं येणाऱ्या भाविकांना होणारी गैरसोय टाळण्यासाठी त्र्यंबकेश्वर देवस्थान परिसर आणि शहरातील अनधिकृत बांधकामं आणि अतिक्रमणांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. ही मोहीम येत्या सोमवारपर्यंत सुरू राहणार आहे. बांधकामं, टपऱ्या आणि अनधिकृत दुकानं यामुळे रस्ते अरुंद झाले आहेत, म्हणून ही कारवाई केली जात असल्याचं महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ५२६ अंकांची वाढ झाली आणि तो ७८ हजार ५१५ वर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १६५ अंकांच्या सुधारणेसह २४ हजार ३६२ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

आयपीएल मध्ये आज गुजरात टायटन्स आणि कोलकता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे. अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडीअममध्ये थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता सामना सुरू होईल.

कोलकता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><>**

गेल्या २४ तासात विदर्भात काही ठिकाणी आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी तापमानात लक्षणीय वाढ झाली, तर मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी उद्या जिल्ह्यातल्या सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे.

//<><><><><>//